"राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेसाठीच्या (National Apprenticeship Promotion Scheme) योजनेकरीता नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांकास मान्यता देणेबाबत"

# महाराष्ट्र शासन

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग

## शासन निर्णय क्रमांक :- राशिउ-२०२२/प्र.क्र.६४/व्यशि-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १० नोव्हेंबर, २०२२

<u>वाचा</u> :- १. शासनाचा समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक ०२.०८.२०२२
२. Govt. Of India Ministry of Finance Dept. of Expenditure PFMS Division letter dated 23.03.2021
३. केंद्र शासनाचे, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाचे क्र. F.No. MSDE-१२/०१/२०१९-AP(PMU) दिनांक - १३.०७.२०२१ चे पत्र

**<u>प्रस्तावना :-</u>**

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. केंद्र शासनाचा शिकाऊ उमेदवारी अधिनियम, १९६१ नुसार सदर योजनेची राज्यात योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. तसेच केंद्र शासनाने वेळोवेळी काढण्यात आलेल्या अधिसूचनेव्दारे योजनेचे कार्यान्वयन करण्यात येते.

सदर योजनेंतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना औद्योगिक आस्थापनामध्ये शिकाऊ उमेदवार म्हणून प्रशिक्षण देण्यात येते. व त्यानुसार औद्योगिक आस्थापनांना केंद्र शासनामार्फत प्रति उमेदवार विद्यावेतन अदा करण्यात येते. सदर योजनेंतर्गत केंद्र शासनामार्फत उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग योग्यप्रकारे होण्याकरीता केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ व ३ च्या पत्रान्वये राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना ही PFMS प्रणालीशी जोडून SNA खाते उघडण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. व त्याअनुषंगाने सदर योजनेकरीता नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांकास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय** :-

राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेस संदर्भ क्र. १ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर केंद्र पुरस्कृत योजनेसाठी निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी तसेच शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनावर होणारा खर्च भागविण्यासाठी आवश्यक असलेले नवीन लेखाशिर्ष व संगणक सांकेतांकास खालिलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

| मराठी | | | इंग्रजी | | |
|---|---|---|---|---|---|
| मागणी क्रमांक | झेडए-२ | | **Demand No.** | ZA-2 | |
| मुख्य लेखाशीर्ष | २२३० | कामगार, सेवायोजन व कौशल्य विकास | **Major Head** | 2230 | Labour, Employment and Skill Development |
| उपमुख्य लेखाशीर्ष | ०३ | प्रशिक्षण | **Sub Major Head** | 03 | Training |
| गौणशीर्ष | १०२ | शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | **Minor Head** | 102 | Apprenticeship Training |
| गटशीर्ष | (०१) | शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | **Group Head** | (01) | Apprenticeship Training |
| उप गटशीर्ष | (०१)(०३) | राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजना (१०० % केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम) | **Sub Group Head** | (01)(03) | National Apprenticeship Promotion Scheme (100% Centrally Sponsored Scheme) (Scheme) |

तसेच प्रधानशिर्ष २२३० अंतर्गत १०२ या गौणशिर्षाखाली २२३०ए८२६ असा आठ अंकि संगणक सांकेतांक आहे.

सदर शासन निर्णय महालेखापाल कार्यालय (लेखा व हकदारी) - I, महाराष्ट्र,मुंबई यांच्या क्र.सं:ख.वि/चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओअर-६८/२०२२-२३ दिनांक २६.०९.२०२२ व वित्त विभाग यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२१११०११५०२९४२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vinod Sheshrao Bondre

Digitally signed by Vinod Sheshrao Bondre
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Skill Development and Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4bd97b779f6f1e9e61491311a06aac663b01b00963f2e754c6ee2d5f7c14953d, serialNumber=c313a8b86d67716d182c41d1e22f57d99c8ee5f4654a216d8fe23b5ad24ed271, cn=Vinod Sheshrao Bondre
Date: 2022.11.10 11:55:14 +05'30'

( विनोद बोंदरे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

३. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई /पुणे /नाशिक /औरंबाद /अमरावती /नागपूर
६. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,मुंबई /पुणे /नाशिक /औरंगाबाद /अमरावती /नागपूर
७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (सर्व)
८. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
९. महालेखापाल ( लेखा वअनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१०.महालेखापाल ( लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
११.महालेखापाल ( लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१२.अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई,
१३.निवासी व लेखा परीक्षा अधिकारी ,मुंबई,
१४.जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय (सर्व)
१५.उप सचिव, कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभाग,मंत्रालय, मुंबई
१६.निवड नस्ती (व्यशि-३).